# Bhushan Gagrani | आपला देश पुरोगामी लोकशाही व समतावादी मूल्यांचे समर्थन करणारा, प्रधान सचिव भूषण गगराणी यांचे प्रतिपादन

Navarashtra News Network
| नवराष्ट्र.कॉम



७३ वर्षांपूर्वी भारतीय राज्यघटना लागू झाल्यानंतर भारत हे प्रजासत्ताक झाले आणि आज संपूर्ण जगासमोर, प्रत्येक भारतीय अभिमानाने सांगू शकतो की, आपला देश हा पुरोगामी लोकशाही आणि समतावादी मूल्यांचे समर्थन करीत आहे. तेव्हापासून आजपर्यंत भारताने आज बराच मोठा पल्ला गाठला आहे.

मुंबई : देशात २६ जानेवारी म्हणजे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ७३ वर्षांपूर्वी भारतीय राज्यघटना लागू झाल्यानंतर भारत हे प्रजासत्ताक झाले आणि आज संपूर्ण जगासमोर, प्रत्येक भारतीय अभिमानाने सांगू शकतो की, आपला देश हा पुरोगामी लोकशाही आणि समतावादी मूल्यांचे समर्थन करीत आहे. तेव्हापासून आजपर्यंत भारताने आज बराच मोठा पल्ला गाठला आहे. असे महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी म्हणाले.

वर्ल्ड ट्रेड सेंटरने आयोजित केलेल्या ७३ व्या प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण त्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येक राष्ट्राच्या राष्ट्र उभारणीत त्या राष्ट्रातील नागरिक महत्वाची भूमिका बजावत असतात. या निमित्ताने मी सर्व नागरिकांना आणि वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या टीमला मनःपूर्वक शुभेच्छा देतो असेही ते पुढे म्हणाले. आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देणाऱ्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या मुंबईच्या भूमिकेबद्दल बोलताना गगराणी म्हणाले की, भारतामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने आपला एक वेगळा ब्रँड विकसित केला आहे.

याप्रसंगी रशिया, मॉरिशस, अर्जेंटिना, इस्रायल, जपान, मलेशिया या आणि इतर देशांचे कॉन्सिल जनरल तसेच वर्ल्ड ट्रेड सेंटरचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी सुद्धा स्वातंत्र्य भारताच्या वाटचालीचे आणि विकासाचे कौतूक केले.

शब्दांना सत्याची धार
प्रहार



प्रजासत्ताक दिनानिमित्त वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात नगरविकास खात्याचे प्रधान सचिव भूषण गगराणी आवर्जून उपस्थित होते. तसेच डॉ. विजय कलंत्री, रूपा नाईक आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

Mumbai Edition
Jan, 31 2022 Page No, 3